पुण्य नगरी

श्री कृष्ण माध्यमिक विद्यालयात सायबर सुरक्षा जनजागृती

जामनेर : डिजिटल युगात वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी श्री कृष्ण माध्यमिक विद्यालय, पाचोरा रोड, शेंदुर्णी येथे विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. दि. ३० जुलै रोजी सकाळी ७ ते ८ या वेळेत झालेल्या ८ वी ते १० वीच्या सुमारे २५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या सत्रात प्रियदर्शनी भांडारकर व खुशबू लांबोळे यांनी विद्यार्थ्यांना ऑनलाइन फसवणूक, फिशिंग, विशिंग, स्मिशिंग, ओटीपी व पासवर्ड सुरक्षितता, मजबूत पासवर्ड तयार करण्याचे महत्त्व, द्विस्तरीय प्रमाणीकरण, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, बनावट लिंक व क्यूआर कोड स्कॅमपासून सावध राहण्याबाबत आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मीराबाई इंगळे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले.